**Newspaper: Maharashtra Times**

**Article Date: 20th February 2018**

**Article regarding 75 years Celebration of Podar**

# बीफसाठी फेस्टिव्हल कशाला?

## उपराष्ट्रपती नायडूंचा सवाल; पोदार कॉलेजचा अमृतमहोत्सवी कार्यक्रम

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

सरकारच्या गोमांस बंदीच्या निर्णयाला विरोध म्हणून बीफ फेस्टिव्हल आयोजित करणाऱ्यांना उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांनी सोमवारी चांगलेच खडे बोल सुनावले. 'तुम्हाला बीफ खायचं आहे ना? जरूर खा. पण त्यासाठी फेस्टिव्हल कसले भरवता?' असा थेट सवाल उपराष्ट्रपती नायडू यांनी मुंबईत एका कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित केला.

माटुंगा येथील एस. पी. मंडळी शिक्षण संस्थेच्या आर. ए. पोदार कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड कॉमर्सच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विशेष कार्यक्रमाचे उद्घाटन सोमवारी उपराष्ट्रपती नायडू यांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी बोलताना त्यांनी वरील प्रश्न उपस्थित केला.

यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते 'कल आज और कल' या विशेषांकाचे प्रकाशन पार पडले. याप्रसंगी उपराष्ट्रपती यांच्यासह गृह राज्यमंत्री प्रकाश मेहता, आमदार माधुरी मिसाळ, एस. पी. मंडळींचे सोहनलाल जैन आणि कॉलेजच्या प्राचार्य डॉ. शोभना वासुदेवन आदी मान्यवर उपस्थित होते. उपराष्ट्रपतींनी यावेळी मराठी भाषेत भाषणाला सुरुवात करून उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांची दाद मिळविली.




ते म्हणाले, 'कुणी काय खावं आणि काय खाऊ नये, हा ज्याच्या-त्याच्या आवडीचा प्रश्न आहे. मात्र, काही लोक विनाकारण प्रत्येक मुद्द्याला राजकीय रंग देऊन काहीही वक्तव्य करतात. बीफप्रमाणेच किस फेस्टिव्हलचं. तुम्हाला कुणाला किस करायचं आहे, तर फेस्टिव्हल कशाला लागतो? कुणाच्या परवानगीची गरज का भासते?'

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले, 'आपण मातृभाषेत अधिक चांगल्या प्रकारे आपले म्हणणे मांडू शकत असल्याने मातृभाषेचा न्यूनगंड बाळगू नका. आपली मातृभाषा ही आपली डोळे असून इतर भाषा आपला चष्मा आहे, असा सल्ला देताना राज्यांनी शाळांमध्ये मातृभाषा बंधनकारक करावी,' असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

'आज भारताची तरुण देश म्हणून ओळख आहे कारण भारताच्या लोकसंख्येपैकी ६५ टक्के लोकसंख्येचे सरासरी वय ३५ वर्षं आहे. हीच लोकसंख्या भारताची ताकद आहे. आपल्या भारतीय संस्कृतीचे, परंपरेचे जतन आणि संवर्धन करणे ही आपली जबाबदारी असल्याचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. आयुष्यात आई, जन्मभूमी, मातृभाषा, मातृभूमी आणि गुरू या पाच गोष्टी कधी विसरू नका,' असे भावनिक आवाहन त्यांनी यावेळी केले.

### अफझल गुरूचा जयजयकार कशासाठी?

'काही लोक अफझल गुरूच्या नावाचा जप करतात. त्याने देशाची संसद उडवून देण्याचा कट रचला होता. हे आपण लक्षातच घेत नाही. त्याचा जयजयकार कशासाठी? याविरोधात काही बोललो तर अभिव्यक्ती स्वतंत्रबद्दल विचारणा केली जाते. आज दहशतवाद हा मानवतेचा सर्वात मोठा शत्रू आहे. अशा दहशतवाद्यास लोकशाहीत स्थान नको,' असे ते म्हणाले